अध्याय १ ला.

(१) संजय। धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः
मामकाः च एव पाण्डवा च किम् अकुर्वत?

हा पहिलाच आणि एकमेव प्रश्न धृतराष्ट्राने संजयला विचारला आहे. आणि नंतर संजय युद्धभूमिवर घडणाऱ्या घटना वर्णन करीत आहे या प्रश्नात सुद्धा धृतराष्ट्राची स्वार्थी वृत्ती दिसून येते. वास्तविक धृतराष्ट्राची आणि पंडुची मुले कुरुवंशीयच होती. तरीसुद्धा त्यांना समान न मानता माझ्या आणि पांडवांनी काय केले असा प्रश्न विचारतो. त्याउलट अर्जुन मात्र प्रतिस्पर्धी पक्षातील नातेवाईकांना 'स्वजन' म्हणतो. हा दोघांमधील महत्त्वाचा फरक आहे.

(२) आता संजय उत्तर देत आहे. त्यात तो दुर्योधनाला राजा म्हणून संबोधित आहे. कारण धृतराष्ट्राला सर्वात जास्त दुर्योधनाविषयी आपलेपणा वाटत होता आणि परंपरेच्या दृष्टीने देखील दुर्योधनच युवराज होता.

तो दुर्योधन द्रोणाचार्यांजवळ जाऊन असे वचन बोलला, आता द्रोणाचार्यांजवळच प्रथम का गेला भीष्मांजवळ का नाही? तर द्रोणाचार्यांना अर्जुनाबद्दल विशेष प्रेम होते म्हणून त्यांना आपल्या बाजूने करून घेण्यासाठी तो आचार्यांजवळ गेला. वचन - नीतियुक्त गंभीर वचने

Sunday 18

(३) येथे मुद्दाम द्रुपदपुत्रेण या पदाचे प्रयोजन केले आहे कारण द्रुपद व द्रोणाचार्य यांच्यात वैरभावना होती म्हणून मुद्दाम उच्चारले आहे महती चमू म्हणजे प्रचंड सेना - असे म्हणण्याचे कारण की ते व्यूहाकार

| December '08 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52-53 | |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

रचनेने रचले होते त्यामुळे ते कमी असून जास्त भासत होते. शिवाय त्यांच्यात ऐक्यभावना होती.

(४)(५)(६) इषु म्हणजे बाण आणि इष्वास म्हणजे धनुष्य अशी विशाल आकाराची धनुष्ये ज्यांच्या जवळ आहे ते महेष्वास! अशा प्रकारच्या धनुष्यावर बाण योजून प्रत्यंचा (दोरी) खेचण्यासाठी खूप शक्ती लागते. म्हणजेच हे सर्व योद्धे बलवान आहेत. युद्धकलेमध्ये निपुण आहेत.
युयुधान - सात्यकि (हा अर्जुनाचा शिष्य आहे... कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी (श्रीकृष्णाने आपली नारायणी सेना दुर्योधनाला दिली तरीही) तो अर्जुनाच्या म्हणजे आपल्या गुरूच्याच बाजूने उभा राहिला. (पण अर्जुन मात्र आपल्या गुरूच्या म्हणजेच तुमच्या विरुद्ध बाजूने लढण्यास उभा आहे)
विराट, द्रुपद धृष्टकेतु हे सर्व पांडवसेनेत आहेत
चेकितान सर्व यादवसेना कौरवांच्या बाजूने लढत असताना हा यादव मात्र पांडवांकडून लढण्यास उभा आहे. काशिराज हा अत्यंत पराक्रमी होता. पुरुजित आणि कुंतिभोज हे कुंतीचे भाऊ म्हणजेच पांडवांचे मामा होते. शैब्य हा युधिष्ठिराचा सासरा आहे हा श्रेष्ठ आणि बलवान आहे.
युधामन्यु आणि उत्तमौजा हे पांचाल देशाचे बलवान शूरवीर होते. सौभद्र श्रीकृष्णाची बहीण सुभद्रा हिचा पुत्र म्हणजेच अभिमन्यु आणि द्रौपदेय म्हणजे द्रौपदीची मुले! हे सर्व महारथी आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

(७) आता दुर्योधन आपल्या पक्षातील प्रमुख नायका विषयी सांगत आहे. पांडवांची सैना समोर दिसत होती म्हणून तिसऱ्या श्लोकात पश्य म्हणजे पहा असे म्हटले आहे परंतु आता आपल्या सैन्याकडे दुर्योधनाची, द्रोणाचार्यांची पाठ आहे म्हणून पहा न म्हणता ध्यान द्यावे या अर्थी निबोध या क्रियेचा वापर केला आहे. आपल्या सैन्येत सुद्धा सेनानायक, महारथी आहेत. आपल्याला केवळ स्मरण करुन देण्यासाठी मी त्यांची नावे सांगत आहे.

(८) आता प्रथम आपण स्वत: (द्रोणाचार्य) आणि पितामह भीष्म विशेष पुरुष आहात. त्यानंतर आहे पराक्रमी कर्ण, संग्रामविजयी कृप, शस्त्रकलेमध्ये निपुण असा अश्वत्थामा. शिवाय धर्मात्मा विकर्ण व सोमदत्ताचा पुत्र भूरिश्रवा यांनी मोठमोठे यज्ञ केले आहेत. ते पराक्रमी आणि महारथी आहेत.

(९) आतापर्यंत जी नावे सांगितली त्यांच्याव्यतिरिक्तही अनेक शूरवीर महारथी आहेत जे माझ्यासाठी प्राणार्पणाही करतील. मागे हटणार नाहीत. युद्ध कसे करावे, कोणत्या प्रकारे करावे. कोणत्या युक्त्या योजाव्यात सेनेला कशा प्रकारे उभे करावे वगैरे कलेमध्ये ते प्रवीण आहेत. या श्लोकात दुर्योधनाचा अहंकार अधोरेखित झाला आहे.

(१०) या श्लोकात भीष्मांनी रक्षिलेले आमचे सैन्य अपर्याप्त म्हणजे खूप मोठे आहे असा एक अर्थ आहे आणि दुसरा अर्थ म्हणजे ते सैन्य पुरेसे नाही

© www.madhaveeraghuveer.com

समर्थ नाही. कौरवांकडे ११ अक्षौहिणी सैन्य होते तर पांडवांकडे केवळ ७ अक्षौहिणी सैन्य होते. पांडवाचे सैन्य पर्याप्त म्हणजे कमी आहे परंतु समर्थ आहे. ते सैन्य भीमाने रक्षण केले आहे असे म्हटले आहे. वस्तुत: भीम काही सेनापती नव्हता परंतु येथे दोन्ही सैन्याच्या शक्तीविषयी विचार सुरु आहे म्हणून अर्जुन सेनापती असून सुद्धा भीमाचे नाव घेतले आहे. दुर्योधनावर सुरुवातीपासूनच भीमाच्या शक्तीचा, बळाचा प्रभाव होता. म्हणूनच दुर्योधन पांडवसेनेला पाहून प्रथम द्रोणाचार्यांकडे जातो कारण त्याच्या अंत:करणात भीतीने घर केलेले असते.

दुर्योधनाने श्रीकृष्णाच्या नारायणी सेनेचा स्वीकार केलेला आहे तर अर्जुनाने केवळ नि:शस्त्र असा भगवान श्रीकृष्ण आपल्या पक्षात असावा असा आग्रह धरलेला आहे अर्जुनाची दृष्टी भगवंतांवर तर दुर्योधनाची दृष्टी वैभवावर आहे म्हणून अर्जुनाचे अंत:करण बलवान तर दुर्योधनाचे अंत:करण कमजोर आहे.

(११) आता दुर्योधन पितामह भीष्माचार्यांना खुश करण्यासाठी आपल्या सैन्यातील महारथींना म्हणतो. सर्वांनी आपल्याला नियुक्त केलेल्या ठिकाणी स्थिर राहून सर्व बाजूंनी भीष्मांचे रक्षण करावे.

१) वयोवृद्ध पितामह म्हणून आदर दाखवण्यासाठी
२) सेनापती सुरक्षित असेल तर सेनेचे मनोधैर्य टिकते.

© www.madhaveeraguveer.com

9.00 ३) जर शिखंडी भीष्मांसमोर आला असता जर प्रतिज्ञेनुसार भीष्म त्यांच्यावर शस्त्र चालवणार
10.00 नाहीत व शिखंडीच त्यांच्यावर शस्त्राचा वार करेल म्हणून त्यांचे रक्षण विशेषत्वाने करायला सांगितले
11.00 आहे. (१२) यानंतर प्रभावशाली पितामह भीष्मांनी दुर्योधनाला हर्षित करत शंख वाजवला. सिंहनाद
12.00 ज्याप्रमाणे सिंहाची गर्जना ऐकून हत्तीसारखे मोठमोठे पशु सुध्दा भयभीत होतात त्याप्रमाणे
1.00 इतरांनी भयभीत व्हावे आणि दुर्योधनाने खूश व्हावे म्हणून शंख वाजवला. द्रोणाचार्य आणि दुर्योधनाचा
2.00 विद्येचा संबंध होता परंतु भीष्माचार्यांचा कौटुंबिक संबंध होता. त्यामुळे स्नेहवशात पक्षपात होतो.
3.00 (१३) भीष्माचार्यांनी शंख वाजवल्याबरोबर कौरव सैन्यातील रणवाद्ये एकदम वाजू लागली. शंख, भेरी
4.00 (नगारे) पणव (ढोलके) आनक (मृदंग) गोमुख (रणशिंग) या सर्व वाद्यांचा नाद फार भयंकर झाला.
5.00 (१४) हे सर्व कौरवसेनेचे वर्णन करून आता संजय पांडवाकडील सेनेचे वर्णन करीत आहेत.
6.00 चित्ररथ नावाच्या गंधर्वाने अर्जुनाला दिव्य असे शंभर घोडे दिले होते. यांचे वैशिष्ट्य असे की
7.00 युध्दामध्ये कितीही घोडे मारले गेले तरी यांची संख्या शंभरच रहात असे. त्यापैकी सुंदर आणि
8.00 शिकवून तयार केलेले असे पांढऱ्याशुभ्र रंगाचे चार अश्व अर्जुनाच्या रथाला जुंपले होते. तसेच अग्निदेवतेने प्रसन्न होऊन अर्जुनाला एक दिव्य रथ

© www.madhaveeraghuveer.com

दिला होता. त्यावरील ध्वज वीजेप्रमाणे चमकत असे
आणि एक योजन म्हणजे चार कोसपर्यंत फडकत
असे. तो ध्वज कोणत्याही वृक्षामध्ये अडकत नसे.
या ध्वजावर श्री हनुमान विराजमान झाले होते.
अशा या महान रथावर विराजमान असणाऱ्या
माधव आणि पांडवाने दिव्य शंख फुंकले.
(१५) आता कोणते शंख? त्यांची नांवे पांचजन्य व
देवदत्त. आणि भीमाचा शंख पौंड्र
(१६) युधिष्ठिराला येथे राजा आणि कुंतीपुत्र अशी
दोन संबोधने वापरली आहेत. त्यांच्या शंखाचे
नाव अनंतविजय होते व नकुलाचा सुघोष तर
सहदेवाचा मणिपुष्पक नावाचा शंख होता.
(१७)(१८) काशिराजपुत्र शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट
सात्यकि, राजा द्रुपद, द्रौपदीचे पाच पुत्र, सौभद्र-
अभिमन्यु यासर्वांनी सर्व बाजूंनी निरनिराळे
शंख वाजवले. (१९) ते शंखवादन इतके तीव्र
भयंकर आणि मोठे होते की त्या ध्वनी-प्रतिध्वनीने
पृथ्वी आणि आकाश व्यापून गेले आणि त्या
आवाजाने धृतराष्ट्राच्या पुत्रांची आणि संबंधित
राजांची हृदये विदीर्ण झाली. धार्तराष्ट्राणाम् —
अन्यायेन धृतं राष्ट्रं यैः ते धृतराष्ट्राः - तेषाम्
जे धर्मानुसार आपल्या कर्तव्याचे पालन करतात
त्यांचे हृदय मजबूत असते. परंतु जे अधर्म,
अन्याय आणि पाप करतात त्यांचे हृदय कमजोर
असते. त्यांनी स्वत: केलेले पाप व अन्याय हेच

© www.mahaveeraghuveer.com

त्यांच्या हृदयाला कमकुवत करतात आणि त्यांच्या हृदयात भीती निर्माण होते. ज्या रावणाला त्रैलोक्य घाबरत होते तोच रावण सीतेचे हरण करायला गेला तेव्हा इकडे तिकडे पहात भीतभीत गेला

(२०) कपिध्वज - अर्जुनाचे एक नाव! भीम सुगंधी कमळे आणण्यासाठी जात असताना हनुमानाने वृद्ध वानराचे रूप घेऊन त्याची वाट अडवली. भीमाचे गर्वहरण झाले त्याने क्षमा मागितल्यावर हनुमानाने रामकथा ऐकवली व आपले विराट रूप दाखवले तेव्हा युद्धाच्या वेळी सिंहनाद अधिक तीव्र करण्याचा आणि अर्जुनाच्या रथावर बसून मी भयंकर गर्जना करेन की ज्यामुळे शत्रू गर्भगळित होतील व पांडवांना जय मिळवणे सोपे जाईल. अशा रीतीने अर्जुनाच्या रथावर हनुमान आहे. म्हणून त्याला 'कपिध्वज' म्हणतात. या विसाव्या श्लोकात अर्जुनाची स्थिती चंचल झाली होती. त्याचा युद्धाचा निश्चय डळमळीत झाला होता म्हणून येथे 'कपिध्वज' हे नाव वापरले आहे.

(२१) त्याचप्रमाणे या श्लोकात श्रीकृष्णासाठी 'अच्युत' हे नाव योजले आहे. देश, काल, वस्तू या कोणत्याही गोष्टीमुळे जो आपल्या मूळ स्थानापासून च्युत होत नाही तो अच्युत! त्या भगवान श्रीकृष्णाला अर्जुन आपला रथ दोन्ही सैन्याच्या मध्यभागी उभा करायला सांगत आहेत. (२२) कशासाठी? तर तोपर्यंत युद्धाच्या इच्छेने सैन्यासह आलेल्या कौरवसैन्यातील राजेलोकांना मी पाहतो. या प्रसंगी मला

| December '08 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 49 | 50 | 51 | 52 | 53 |
| Monday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Tuesday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Wednesday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Thursday | 4 | 11 | 18 | 25 | |
| Friday | 5 | 12 | 19 | 26 | |
| Saturday | 6 | 13 | 20 | 27 | |
| Sunday | 7 | 14 | 21 | 28 | |

| January | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Week | 01 | 02 | 03 | 04 | 05 |
| Monday | | 5 | 12 | 19 | 26 |
| Tuesday | | 6 | 13 | 20 | 27 |
| Wednesday | | 7 | 14 | 21 | 28 |
| Thursday | 1 | 8 | 15 | 22 | 29 |
| Friday | 2 | 9 | 16 | 23 | 30 |
| Saturday | 3 | 10 | 17 | 24 | 31 |
| Sunday | 4 | 11 | 18 | 25 | |

कोणाकोणाशी युद्ध करावयाचे आहे? माझ्याबरोबरीचे कोण आहेत? माझ्यापेक्षा कमी किंवा अधिक सामर्थ्यवान कोण आहेत? त्या सर्वांना मी पाहून घेतो.

(२३) दुष्टबुद्धी दुर्योधनाचे प्रिय करण्यासाठी त्याला जय मिळवून देण्यासाठी कोणकोणते राजे आले आहेत यांच्या मनात युद्ध करण्याची इच्छा प्रबल आहे

(२४)(२५) गुडाकेश (१) गुडा + केश म्हणजे कुरळे केस असणारा। (२) गुडाका + ईश - निद्रेवर विजय मिळवणारा। (३) गुडम् अकाति इति गुडाक (गुड - गोल, ब्रह्मांड) सर्व ब्रह्मांडाला जो अंतर्बाह्य व्यापतो तो देव - शिव होय. म्हणून शिव ही ज्याची इष्टदेवता आहे तो गुडाकेश म्हणजेच अर्जुन (४) गुडवत् मधुरः सन् भक्तान् अकाति इति गुडाकः म्हणजे गुळाप्रमाणे मधुर होऊन जो भक्तांवर कृपा करतो तो शिव आणि हा शिव ज्याचे आराध्यदैवत आहे तो अर्जुन - गुडाकेश

हृषीकेश - हृषीक म्हणजे इंद्रिये. जो इंद्रियांचा स्वामी आहे; ज्याने इंद्रियांवर विजय मिळवलेला आहे तो हृषीकेश म्हणजेच भगवान श्रीकृष्ण

असा तो श्रीकृष्ण पार्थाला सांगत आहे.

कुरून् पश्य।

(२६)(२७) आता पृथानंदन अर्जुन कुरुसैन्याचे निरीक्षण करीत आहे. त्या सेनेत त्याला आचार्य, मामा, भाऊ, मुले, नातवंडे, सोबती, स्नेही दिसत आहेत. या सर्वांना नीट पाहून भीतीने ग्रस्त होऊन

कुंतिपुत्र अर्जुन विषाद करीत असे म्हणाला —
(२८) (२९) (३०) समोर उभ्या असणाऱ्या या कुटुंबीयांना पाहून माझी गात्रे शिथिल होत आहेत. तोंडाला कोरड पडत आहे, शरीराला कंप सुटला आहे. अंगावर रोमांच उभे रहात आहेत. माझ्या हातातून गांडीव धनुष्य गळून पडत आहे. त्वचेचा दाह होत आहे माझे मन भ्रमिष्टासारखे झाले आहे आणि मी उभे राहण्यासही समर्थ नाही. — शारिरीक अवस्था
(३१) शिवाय अपशकुनही होत आहेत ते भविष्य काळातील अनिष्ट सूचकच आहेत असे वाटते. त्यामुळे या युद्धात स्वजनांना मारून काही कल्याणकारक होईल असे मला वाटत नाही.
(३२) मला विजयाची, राज्याची इच्छा नाही आणि सुखाचीही इच्छा नाही. हे गोविंद आम्हाला राज्यापासून किंवा भोगापासून किंवा जगण्यापासून तरी कोणता लाभ होणार आहे? विजय, राज्य, जीवित आणि सुखोपभोग या चारही गोष्टी मला नकोत असे अर्जुन करुणेपोटी म्हणतो त्याचे समर्थन तो पुढे करतो.
(३३) ज्यांच्यासाठी या सर्व गोष्टींची इच्छा करायची तेच या युद्धात लढण्यासाठी समोर उभे आहेत
(३४) कोण कोण आहेत ते सांगितले आहे (३५) आपि या पदाचा दोनदा उपयोग झालेला आहे. हे मारण्यास प्रवृत्त झाले तरीही किंवा मला त्रैलोक्याचे राज्य मिळाले तरीही मी यांना मारू इच्छित नाही

(३६) आततायी कोणाला म्हणावे?

आग लावणारा, विष देणारा, हातात अकारण किंवा द्वेषापोटी शस्त्र धरणारा, कपटाने धनाचे अपहरण करणारा, मसीन व राज्य तुबाडणारा, आणि पाप-बुद्धीने स्त्रीचे अपहरण करणारा ही सहा लक्षणे आततायी शब्दाची आहेत. ही कौरवांना तंतोतंत लागू पडतात. अशा आततायींचा वध केला तरी पाप लागत नाही, असे मनुस्मृतीत सांगितले आहे. परंतु अर्जुनाला ते पटले नाही. त्यांना मारुन पापच लागेल असे त्याला वाटते इथे तो जनार्दन हे संबोधन वापरतो. जन + अर्दन लोक + पीडा / संहार करणारा. प्रलयकाली भगवंत सर्वांचाच संहार करतात पण ते निर्लेप असल्याने नाशकर्मापासून उद्भावणारे पाप त्यांना लागत नाही. इथेही कौरवसेनेच्या संहाराचे काम भगवंतानेच करावे हा भावार्थ आहे.

(३७) माधव - मा + धव म्हणजे लक्ष्मीचा पती किंवा मायेचा पती कुरुक्षेत्रावरील लीला ही त्याचीच माया आहे. तेव्हा जे काही करावयाचे ते त्यानेच करावे अशी अर्जुनाची इच्छा आहे

तस्मात् - उपसंहार

(३८) (३९) युद्धात स्वजनांना मारल्यामुळे कौरव आणि पांडव दोघांनाही पाप लागणार होते. मग अर्जुनानेच उलट पाप पुण्याचा विचार करण्याचे कारण काय? तर कुलक्षयाचे दोष आणि मित्रद्रोहाचे

पातक कौरवांना कळत नसले तरी पांडवांना कळत होते कारण त्यांच्या ठायी विवेक आहे, धर्माचरण आहे. अर्जुनाच्या मते कुलक्षय महादोषस्वरूप आहे. कुलक्षयामुळे कोणकोणते दोष उत्पन्न होतात हे पुढील श्लोकात आलेले आहे.

(४०) जेव्हा कुळाचा नाश होतो तेव्हा निरंतर कुळा-सोबत राहणारे कुळधर्मही नाहीसे होतात. आणि धर्म नष्ट झाल्यावर सर्व कुळावर अधर्माचा पगडा बसतो. कुलधर्म कोणते आणि महाकुळाची लक्षणे कोणती?

तपो दमो ब्रह्मवित्तं वितानां
पुण्या विवाहाः सततान्नदानम् ।
येष्वेवैते सप्त गुणा वसन्ति
सम्यग्वृत्तास्तानि महाकुलानि ॥

तप, इंद्रियसंयम, वेदाध्ययन, यज्ञकर्म, पवित्र विवाह सदा अन्नदान आणि सदाचार हे सात गुण जिथे असतात तीच महाकुळे होत.

धनहीन असेल पण सदाचरणी असेल तर तो महाकुळातील समजावा. परंतु गुरेढोरे, घोडे शेती यांनी समृद्ध असेल व आचरण शुद्ध नसेल तर प्रतिष्ठा प्राप्त होत नाही

(४१) संकराचे भयंकर परिणाम - वर्णसंकर, जातीसंकर भाषा संकर, आहार संकर! या सर्वांपेक्षा धर्मसंकर भयंकर आहे. त्यामुळे स्त्रिया भ्रष्ट होतील आणि परिणामी सगळे कुळ नासेल.

© www.madhaveeraghuveer.com

या श्लोकात कृष्ण - आकर्षित करणारे, खेचणारे या अर्थी संबोधन वापरले आहे. शिवाय कुळाविषयी चिंता वाटत आहे म्हणून वृष्णिवंशीय म्हणजेच वार्ष्णेय हे संबोधन दिले आहे.

(४२) वर्णसंकराने झालेली वंशवृद्धी स्वर्गस्थ पितरांस निरुपयोगी असते. श्राद्धादिक पितृतृप्तीच्या क्रिया अशा संततीकडून होत नाहीत. किंवा जारकर्मापासून झालेल्या संततीमुळे श्राद्धादिकांचे फळ पितरांना प्राप्त होत नाही. ज्या कुळात धर्मकर्मांचा लोप होतो त्याला नरकप्राप्ती होते. शिवाय स्वर्गस्थ पितरांनाही अधःपात घडतो. कुळाच्या धर्माचा, परंपरांचा नाश करणारा तो कुलघ्न ठरतो.

पापी जीवाला मरणोत्तर प्राप्त होणारे यातना-स्थान किंवा दुर्गती म्हणजे नरक होय. मनुस्मृतीत एकवीस नरक दिलेले आहेत. तर शंकराचार्यांच्या वेदान्तसूत्र भाष्य मध्ये सात नरक सांगितले आहेत.

(४३) युद्धामुळे वर्णसंकर झाला तर आणखी अनेक अनर्थ ओढवतील. गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळे जातिधर्म टिकतात तर सत्संगतीमुळे कुलधर्म टिकून राहतात.

नरदेहात येऊन पापकृत्ये करणारे लोक नरकात जातात हे वर्णन आजच्या काळात एवढे भीषण वाटणार नाही कारण अगोदरच एवढे अधःपतन झाले आहे आणि चंगळवादामुळे विलासलका झालेल्या लोकांच्या संवेदना बोथट झाल्या आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

कुलक्षयकारी मानव आपल्याबरोबरच पितृकुल गणासहित नरकात जातो हे गोष्ट केवळ कल्पनेवर आधारलेली नाही, तर त्याला शास्त्राधार आहे.

(४४) दुष्कृत्ये करणारांना पंचभूतांच्या अंशमात्र यातना भोगण्यास उपयोगी असे एक निराळे शरीर निश्चयाने उत्पन्न होते. प्रत्येक व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याची पापपुण्ये तोलली जाऊन तदनुसार त्याला दंड किंवा पारितोषिक प्राप्त होते असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे.

कठोपनिषद - १३.८ मध्ये म्हटले आहे.

स्वर्गः सत्यवचने विपर्यये नरकः।

श्लोक ४० ते ४४ मध्ये स्वजनहत्या व त्याचे भयंकर परिणाम सांगितले आहेत.

(४५) अर्जुन आपला शोक प्रकट करीत आहे 'अहो' शब्दाने आश्चर्य 'बत' शब्दाने खेद व्यक्त केला आहे. त्याला युद्धापासून निवृत्ती हाच धर्म आणि युद्धासाठी प्रवृत्ती हा अधर्म वाटत आहे. अर्जुन जरी युद्धाला विमुख झाला तरी कौरव निश्चितपणे युद्ध करणार तेव्हा त्याचे परिणाम काय होतील हे अर्जुन सांगत आहे.

Sunday 01

(४६) शस्त्ररहित व प्रतिकाररहित असा मला कौरवांनी रणभूमीवर मारले तर ते मारणेही मला कल्याणप्रद होईल कारण प्राणरक्षणापेक्षा धर्मरक्षण श्रेष्ठ आहे. अर्जुनाला वाटत आहे की स्वजनांना जर मारले नाही तर नरकाला कारण होणारा पापसंग्रह टळेल. पुण्य-संचयाचा ऱ्हास होणार नाही. आणि त्यांच्याकडून

जाणता-अजाणता जे पापकर्म घडले आहे त्याचे प्रायश्चित्त त्याला याच जन्मी मिळाले. त्यामुळे त्याच्या पापाची निष्कृती होईल. याने त्याला क्षेम व सुरक्षितता वाटत आहे. तो भ्याड नाही. तो वीरांच्या वीर आहे. परंतु शोक व मोहामुळे तो युद्धापासून पराङ्मुख होऊ इच्छित आहे. त्यातच त्याला भले म्हणजे क्षेमतर वाटत आहे.

(४७) संजय शेवटी सांगत आहे की शोकाकुल चित्ताने रणभूमीवर अर्जुन बाणासहित धनुष्य खाली टाकून तो रथाच्या मागील भागात जाऊन बसला.

अर्जुन हा ब्रह्मविद्येचा अधिकारी होता. फक्त त्याचा नित्यानित्यविवेक भगवंतांना जागवावा लागला. अर्जुनाचा विषाद हा प्रेयसासाठी (लौकिक सुखासाठी) नव्हता तर तो श्रेयसासाठी होता (आत्मकल्याणासाठी) होता. म्हणून तो विषादही किती उपयोगी होता हे लक्षात येते. अर्जुनाच्या विषादामागे उदात्त भूमिका होती. त्यामुळेच सामान्यांच्या विषादाप्रमाणे तो नुसता विषाद न राहता. अर्जुनाच्या विषादाचा 'विषादयोग' झाला आणि संपूर्ण मानवजातीचे कल्याण करणारी अशी ही त्रैलोक्यपावनी भगवद्गीता जन्माला आली.

उपसंहार - दुर्योधन - अहंकार. द्रोणाचार्य - द्रवणाचा स्वभाव असणारे चंचल मन. कौरवांची सेना. पांडु. पांडवांची सेना म्हणजे विवेक, वैराग्य, शम-दम. भीष्म म्हणजे भयंकर व चिरंजीव म्हणजेच आसक्ती. अर्जुन - शुद्ध वैराग्य भगवान श्रीकृष्ण - साक्षात परमात्मा

©www.madhaveeraghulveer.com